Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XIV Issue – II March - April 2025

# अकोले तालुक्यातील आदिवासी व बिगर आदिवासी भागातील माध्यमिक शाळांच्या ऐतिहासिक स्थळांना भेटी संदर्भात शैक्षणिक उपयोगाचा तुलनात्मक अभ्यास करणे

संशोधकाचे नाव
श्री. बाळासाहेब रामभाऊ जाधव
*मातोश्री आसराबाई दराडे महिला शिक्षणशास्त्र महाविदयालय*
*यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ*
*अभ्यासकेंद्र येवला 54499*

मार्गदर्शकाचे नाव
प्राचार्य, डॉ. दादासाहेब मोरे
*मातोश्री आसराबाई दराडे महिला शिक्षणशास्त्र महाविदयालय*
*यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ*
*अभ्यासकेंद्र येवला 54499*

***सारांश:-***

*विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास सामने हे शिक्षणाचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. त्यांच्यावर योग्य संस्कार होणे आवश्यक आहे. त्यासाठी शासन अनेक योजना राबविते शिक्षक प्रशिक्षण अध्यापन पद्धती शैक्षणिक साहित्य शाळेत अनेक बहुतेक सुविधा पुरविते यामध्ये आणखी एक उद्देश असतो तो म्हणजे विद्यार्थ्यांचा विकास साधने होय.*

*अकोले तालुका हा आदर्श तालुका असल्याने तालुक्यात आदिवासी व बिगर आदिवासी भाग पाडतात व या भागात शिक्षण होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या समस्या वेगवेगळ्या असतात. त्यामध्ये विद्यार्थ्यांच्या बुद्ध्यांक आर्थिक परिस्थितीत सामाजिक परिस्थिती शैक्षणिक वातावरण अशा अनेक समस्या असतात. या सर्व समस्यांचा विचार करून आदिवासी व बिगर आदिवासी भागातील विद्यार्थी परिसरातील ऐतिहासिक स्थळांना भेटी देण्याचा व त्यांचा आपल्या अध्यापनात केला जाणाऱ्या उपयोगाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न या अभ्यासातून केला गेला आहे.*

CC BY *Global Online Electronic International Interdicipilinary Research Journal's* licensed Based on a work at *http://www.goeiirj.com*

**महत्वाचे शब्द** – ऐतिहासिक, आदिवासी, बिगर आदिवासी, पर्यटन

## संशोधन लेखाचा मुख्य भाग

या संशोधन लेखांमध्ये आदिवासी व बिगर आदिवासी विद्यार्थ्यांचा कौल आणि तौलानिक अभ्यास होणार आहे. विद्यार्थ्यांना अध्यापन करताना अनेक घटकांचे विश्लेषण करण्यासाठी क्षेत्रभेट, छोट्या-मोठ्या सहलीचे आयोजन करून विद्यार्थ्यांना अध्ययन प्रक्रिया सुलभ कशाप्रकारे होईल व त्यांच्यात विषयाची गोडी निर्माण होईल हे पहिले जाणार आहे. ऐतिहासिक स्थळांना भेटी संदर्भात शैक्षणिक उपयोगांचा तुलनात्मक अभ्यास केला जातो.

## ऐतिहासिक स्थळांची पार्श्वभूमी

१. ऐतिहासिक स्थळांची पार्श्वभूमी व राजकीय लष्करी, सांस्कृतिक किंवा सामाजिक इतिहासाची संबंधित असते.

२. ऐतिहासिक स्थळांना कायद्याने संरक्षण असते आणि अनेकांना आधीकृती ऐतिहासिक दर्जा प्राप्त झाला आहे.

३. ऐतिहासिक स्थळे सामूहिक स्मृतींचे संरक्षक म्हणून काम करतात.

४. ऐतिहासिक स्थळे भविष्यातील पिढ्यांसाठी मानवतेच्या, भूतकाळाच्या मूर्त खुणा जतन करतात.

५. ऐतिहासिकस्थळांच्या भौगोलिक आणि नैसर्गिक पार्श्वभूमी बरोबरच त्यांचे ऐतिहासिक पार्श्वभूमी महत्वाची असते.

ऐतिहासिक स्थळांचे उदाहरणे खालील प्रमाणे कळसुबाई शिखर, हरिश्चंद्रगड, रतनगड, सदाण दरी, कोकण कडा इत्यादी.

अशाप्रकारे वरील स्थळांना आईला नगर जिल्ह्यात ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. तिथे पर्यटक वेगवेगळ्या भागातून येतात. त्यांच्यासाठी सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात तसेच ऐतिहासिक स्थळांचे जतन होण्यासाठी शासन दरबारी प्रयत्न होताना दिसतात. कारण यामुळेच आपली ऐतिहासिक स्थळे सुरक्षित असणार आहेत.

**ऐतिहासिक स्थळांचा आढावा–**

सदर संशोधनात संशोधकाने संबंधित साहित्य व अहवालांचा आढावा घेतलेला आहे. या समस्येशी संबंधित मराठी, इंग्रजी, मासिके यांचा आढावा घेतला आहे.

यामधून असे दिसते की, आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना पर्यटन स्थळांचे महत्त्व जास्त नाही कारण त्यांना त्याविषयी जाणीव जागृत नाही.

या उलट आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना पर्यटन स्थळाविषयी आवड व उत्सुकता दिसून येते तसेच त्यांचा ते अध्ययनात वापर करतात. त्यामुळे त्यांच्या ज्ञानाच्या कक्षा वरून रुंदावतात त्यांच्यात चिकित्सक कृती निर्माण होते.

**ऐतिहासिक स्थळांची सद्यस्थिती :**

अकोले तालुक्यातील शिखर, मंदिर, धरण, दरी, गड, गुहा, जंगल, नद्या किमान २००० वर्षांचा इतिहास जशास तसा ठेवला आहे गरज आहे हा अमूल्य ठेवा जगासमोर येण्याची तसेच शासनाच्या पर्यटन विभागाने योग्य प्रसिद्धी देण्याची.

कळसुबाई शिखर महाराष्ट्रातील सर्वात उंच शिखर असून त्यांची उंची १६४६ मी. हाय मंदिराकडे जाण्यासाठी पायवाट व शिड्यांची व्यवस्था केली आहे. भंडारदरा धरण भिंतीची डागडूनी तसेच धरणाचे दरवाजे अद्यावत करण्यात आले आहेत. धरणातून डावा उजवा कालावा शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी कार्यरत केला आहे. सादण दरी - पर्यटकांना धोका पोहोचू नये म्हणून सुरक्षा रक्षकांची नेमणूक करण्यात आली आहे.

**रतनगड :-** हे हेमाडपयी अत्यंत जुने मंदिर आहे त्याच्या जतन करण्यासाठी पुरातत्व खात्याकडून व्यवस्था केली आहे.

**हरिश्चंद्रगड :-** या गडावरील निसर्गाला धोका न पोहचता प्रदूषण टाळण्यासाठी उपाययोजना केल्या आहेत.

**निष्कर्ष :-**

मुलांना सुरुवातीला पर्यटन स्थळांचे त्रोटक माहिती होती. परंतु संशोधन पूर्ण झाल्यानंतर त्यांना सविस्तर माहिती मिळवून त्यांच्या ज्ञानात भर पडली.

**संदर्भसूची :-**


१. विद्या भारती मार्गदर्शिका

२. सर्वांगीण शैक्षणिक गुणवत्ता विकास 2007

३. विकास शिक्षक मार्गदर्शिका पुणे महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे

४. भिंताडे वि.रा.शै. संशोधन पद्धती (२००८) नित्यनूतन प्रकाशन पुणे

५. मुळे रा.श. आणि उमाठे वि.तू. शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे नूतन प्रकाशन पुणे